५०९११

आरबीआय / २००४/१९
डी सी एम (एन ई) सं. ३१० / ०८.०७.१८ / २००३-०४
१९ जानेवारी २००४

अध्यक्ष, भारतीय स्टेट बँक आणि
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक,
सर्व मुद्रा (चलन) तिजोरी सांभाळण्याऱ्या शाखा

प्रिय महोदय,

**लोकांना नाणी व, नोटा इ. विनियम करण्याच्या सुविधेची तरतूद**

आपल्याला अवगच आहे की, भारतीय रिझर्व्ह बँक जनतेला चलन व नाण्यांचे वाटप व विनिमय अशा सारख्या सेवा देते. आमची क्षेत्रीय कार्यालये नव्या / चांगल्या नोटा आणि नाणी वितरण करीत असतात; खराब नोटा बदलून देतात, फाटलेल्या / तुटलेल्या नोटांचा अभिनिर्णय करीत असतात, तसेच नाणी किंवा नोटा, व्यवहारासाठी किंवा विनिमयासाठी स्वीकारत असतात. त्यांच्या सेवांचा व्याप वाढविण्यासाठी आम्ही सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना, खाजगी क्षेत्रांतील बँकांना तसेच काही विदेशी बँकांना मोठ्या संख्येने चलन तिजोरी व लहान नाणी भांडार उघडण्यास परवानगी दिली आहे. आर बी आय (नोट रिफंड) नियमांनुसार आम्ही फाटलेल्या / तुरलेल्या नोटांचा अभिनिर्णय करण्या संदर्भित सर्व अधिकार सार्वजनिक क्षेत्रांतील बँकांना व बाकी बँकांच्या चलन तिजोरी शाखांना सोपवले आहेत.
२. चलन तिजोरींना आणि त्यांच्याद्वारे चलन तिजोरी नसलेल्या इतर बँकांच्या शाखांना नवीन नोटांचा / नाण्यांचा पुरेसा आणि मुक्त पुरवठा होत आहे याची खात्री होण्यासाठी, नजिकच्या भूतकाळात अनेक उपाय योजले आहेत. आम्ही चलन तिजोरीत मुडलेल्या / फाटलेला नोटांचा साठा तर साफ केलाच आहे पण चलन तिजोरीतून सातत्याने फाटलेल्या नोटांना हलवून त्यांचा तत्वरतेने करन्सी व्हेरीफीकेशन अँड प्रोसेसिंग सिस्टीममधून सुधारित सुरक्षा निगराणी खाली विनियोग करण्यासाठी पुरेशा मूलभूत सोयी केलेल्या आहेत.
३. अ) नवीन / चांगल्या नोटा आणि सर्व किमतीच्या नाण्यांची मागणी पुरवण्या संबंधी, (ब) खराब नोट्या बदलण्या संबंधी (क) फाटलेल्या नोटांचा अभिनिर्णय करण्या संबंधी आणि
(३) व्यवहार किंवा विनिमयासाठी आणि नोटा स्वीकारण्या संबंधी ग्राहक सेवांची व्याप्ति वाढवण्याची नीति म्हणून असे ठरविण्यात आले आहे की देशातील चलन तिजोरी ठेवणाऱ्या बँकांच्या सर्व शाखांनी, या सेवा अधिक सक्रीयतेने आणि जलदपणे नागरीकांना द्याव्यात, म्हणजे त्यांना केवळ या हेतूसाठी रिझर्व्ह बँकेच्या क्षेत्रीय कार्यालयात येण्याची आवश्यकता रहाणार नाही. नागरिकांच्या सोयीसाठी आपल्या शाखांमधील या सेवांच्या उपलब्धतेला आपण प्रसिद्धि द्यावी ही विनंती आहे.
४) कृपया पोच द्यावी.

आपला विश्वासू

(पी.के बिसवास)